# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

**क्र.एचओ /11743 / लेखा दि. 11.10.2022**

**विषय :-** हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक मधील कंत्राटी कर्मचा-याचे कमाल मानधन व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी नियुक्ती बाबत

**संदर्भ :- 1)** एम.जी.सी./एफ/6649 दि.21.04.2022

2) अति.आयुक्त/प.उ./डी/684/ दि. 27.06.2022

मुंबईतील प्राथमिक आरोग्य सुविधेचे सक्षमीकरण करून सर्वसमावेश व आवश्यक प्राथमिक आरोग्य सेवा नागरिकांना त्यांच्या सोयीनुसार उपलब्ध करून देण्यासाठी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक हे उपलब्ध दवाखान्यात दुसऱ्या सत्रात तसेच मोकळ्या जागेवर पोर्टा केबिनमध्ये दोन्ही सत्रात सुरू करण्यासाठी मनपा आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. अशा प्रकारचे 200 हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत व या दवाखान्यामध्ये आवश्यक असलेली GNM, DEO, MPW यांची नियुक्ती मनपाद्वारे कंत्राटी पद्धतीने घेण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त प.उ. यांच्या क्रं. अति.आयुक्त/प.उ./डी/684/ दि. 27.06.2022 मंजुरी अन्वये वृत्तपत्रात जाहिरात देऊन वैद्यकीय अधिका-यांची HBT Clinic मध्ये नियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात आली. सदर जाहिरातीस अनुसरुन कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता 211 अर्ज प्राप्त झाले व HBT Clinic 38 ठिकाणी कार्यान्वित करत असताना अनेक वैद्यकीय अधिका-यांनी नियुक्ती घेण्यास नकार दिला. सर्व वैद्यकीय अधिकारी ज्यांनी दूरध्वनी द्वारे संपर्क साधला असता नकार दिला आहे त्या सर्वांना ई-मेल पाठवून HBT Clinic मध्ये काम करण्यास सारस्य आहे किंवा कसे याबाबत विचरणा करण्यात आली आहे, परंतु अद्याप हवा तसा प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. यास्तव नजकीच्या काळात नवीन HBT Clinic सुरु करण्याचे प्रस्तावित असून पुनःच्छ वृत्तपत्रात जाहिरात देण्याचे व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे. एकूण पात्र उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करुन त्यातून विभागनिहाय प्रतिक्षा यादी विभागास पाठविण्यास व त्यातून अवश्यकतेनुसार विभागामार्फत कार्यालयीन आदेश देण्याचे देखील प्रस्ताविण्यात येत आहे.

मूळ प्रस्तावात पृ.क्र. N 16 वर नमुद किमान मासिक ठोक वेतन वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, बहुउदेशीय कामगार तसेच N 27 वर नमुद सुधारीत किमान मासिक ठोक वेतन औषधनिर्माता यांस मान्यता प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे कमाल मासिक ठोक वेतनास देखील मान्यता प्रस्ताविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :

| **Staff** | **Remuneration per month upto 50 patients per day** | **Maximum incentive per day upto 90 or more patients per day** | **Maximum remuneration per month** |
|---|---|---|---|
| Doctor | Rs. 70,000/- | After 50 patients per day<br>Rs. 40 per patient maximum upto Rs. 1,600 per day | Rs 1,10,000/- |
| GNM | Rs. 25,000/- | After 50 patients per day<br>Rs. 15 per patient maximum up to Rs. 600 per day | Rs. 40,000/- |
| Pharmacist | Rs. 18,000/- | After 50 patients per day<br>Rs. 7 per patient maximum up to Rs. 280 per day | Rs. 25,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| MPW | Rs. 17,000/- | After 50 patients per day<br>Rs. 3 per patient maximum up to<br>Rs. 120 per day<br>excluding incentive for wound dressing | Rs. 20,000/- |

दि. 07.10.2022 रोजी अति.आ.(प.उ) यांनी दिलेल्या निर्देशानुसार HBT Clinic चे कामकाज सुनियोजित व गुणवत्तपुर्वक होण्यासाठी सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहे. पृ.क्र. ते वर जोडण्यात आले आहे. तसेच दि. 07.10.2022 रोजी अति.आ.(प.उ) यांच्या बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे HBT Clinic चे कामकाज सुनियोजित व गुणवत्तपुर्वक होण्यासाठी प्रत्येक रुग्णांना वैद्यकीय अधिकारी यांनी किमान 4 मिनिटे तरी तपासणी व समुउपदेशन साठी देणे गरजेचे आहे.

तरी उ.प. आयुक्त (सा.आ.) यांना विनंती करण्या येते की खालील बाबीस प्रशासकीय मंजुरी दयावी.

1. उपरोक्त प्रस्तावात नमुद वैद्यकीय अधिकारी , परिचारीका, औषधनिर्माता, बहुउदेशीय कामगार यांच्या कमाल मासिक ठोक वेतनास (दररोज 90 रुग्ण तपासल्यास).
2. नव्याने सुरु होणा-या HBT Clinic मध्ये कंत्राटी वैद्यकीय अधिकारी नेमण्याकरिता वृत्तपत्रात व माहापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसारित करुन अर्ज गुगल फार्म (https://docs.google.com/forms/d/1XdEnjk0rFkGuyrUkUnkscVT3aLHjfRh8Ta2_S9WQDaA/edit) मार्फत मागविण्यास.
3. पात्र उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यास व विभागनिहाय प्रतिक्षा यादी विभागास पाठविण्यास तसेच अवश्यकतेनुसार विभागामार्फत कार्यालयीन आदेश देण्यास.
4. वृत्तपत्राच्या जाहिरातीचा खर्च हा जनसंपर्क विभागांच्या यथायोग्य अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यास.

मंजुरी साठी सविनय सादर.

सही/-

(डॉ. मंगला गोमारे)

कार्यकारी आरोग्य अधिकारी

(संजय कु-हाडे)

मा.उपायुक्त (सा.आ.)

महोदय,

(डॉ. संजीव कुमार)

मा. अति. आयुक्त (प.उप.)

महोदय,